**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेसाठी सन२००७-२००८ या आर्थिक वर्षाकरिता लागणारे रजिस्टरे,फॉर्म्स,बुके इत्यादी छपाई कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- या वर्षीचे ऑफीस रिपोर्टा मध्ये छपाईचे किरकोळ आयटेमसह सविस्तर दर दिलेले आहेत या पूर्वी चे ऑफीस रिपोर्टा मध्ये दर दिलेले नव्हते.

मा.सभापती साहेब :- मा.उपायुक्त श्री. हांगे साहेबांनी हा बदल केलेला आहे.

मा.श्री. घुले अ.ह. व मा.श्री. बारस्कर पो.ज.:- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. मैड स.ब. :- आलेले कमीचे दर मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- सर्वानुमते आलेले कमीचे दर मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेसाठी सन २००७-२००८ या आर्थिक वर्षा करिता लागणारे रजिस्टरे, फॉर्म्स, बुके इत्यादी छपाई कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट पहाता कमीचे निविदादरधारक १] आनंद मुद्रणालय २] न्यायसिंधु मुद्रणालय ३] सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स ४] श्रुती ऑपसेट व ५] अभिनंदन सप्लायर्स ऑपसेटस् यांचे कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे तसेच समान दराचे आयटेमची छपाई कमीचे समान निविदा दरधारका कडून सम प्रमाणात करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-४ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -४ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सावेडी येथे अंदाजे एक हजार आसन व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणे साठी तांत्रिक सल्लागार नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदाधारक मे. किर्लोस्कर कंन्सलटंन्ट पुणे यांचे निविदा दरास अंतीम मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अ.नगर म.न.पा. साठी अंदाजे १००० आसन व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणेकामी तांत्रिक सल्लागार नेमणे बाबत.

अ.नगर म.न.पा.साठी सावेडी येथे अंदाजे १००० आसन व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणे बाबत दैनिक लोकसत्ता मध्ये दिनांक ६/४/२००७ रोजी प्रसिध्दी देवुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरच्या निविदा उघडण्यात आल्यांनतर वाटाघाटी करून मे. किर्लोस्कर कन्सलटंट पुणे, (निविदेमधील कन्सलटींगसाठी दर ३ % सर्व्हिस टॅक्स वगळुन) यांची निविदा मा.आयुक्त साहेब यांचे दि. ३१/८/२००७ रोजीच्या मान्यतेनुसार सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- या प्रकरणी नेमलेल्या इंजिनिअरने सर्व काही कारवाई करावयाची आहे का? कोण कोणत्या ऑफर्स आलेल्या आहेत.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- आपण नेमलेल्या एजन्सीला सिटी सर्व्हे सिट देणार व जागेवर करावयाच्या योजने बाबत सुचना देणार नंतर तो आपले कडेस चार पांच डिझाईन पसंती साठी तयार करून देईल आपल्या पसंतीच्या डिझाईन प्रमाणे ती एजन्सी नकाशे काढणे, एस्टीमेट करणे,करावयाच्या कामाच्या निविदा काढणे, एजन्सी नेमणे, कामावर सुपरव्हिजन करणे इत्यादी कामे आपण नेमलेली एजन्सी करेल आपण ठरविलेल्या टप्प्या प्रमाणे त्यांना कामाच्या खर्चाच्या टक्केवारी प्रमाणे त्यांचे पेमेंट केले जाईल पाच कोटी चे काम असेल तर पंधरा लाख त्यांना मिळतील. काम पूर्ण झाले नंतर त्यांना शेवटच्या टप्प्या प्रमाणे पेमेंट दिले जाईल.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- किती लोकांना टेंडर भरले होते.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- दहा कंन्सलटंट यांनी भरले होते. आविस्कार ग्रुप, १.४५ % अशोक काळे ॲड असो. अमदनगर १.९४ % कांकरीया ॲन्ड असो. अहमदनगर २% संदीप गुख ॲन्ड असो. पुणे २.७५ % व सर्व्हिस टॅक्स वेगळा, किर्लोस्कर कंन्सलटंट पुणे ३.९१ % शशी प्रभु ॲन्ड असो. मुंबई ४% प्रोजेक्ट किमंतीच्या असे व इतर दर आलेले आहेत. कामाचा अनुभव पहाता किर्लोस्कर कंन्सलटंट यांचे सर्व्हिस टॅक्स वगळून ३% दर केलेले मान्य आहेत. त्यास अंतीम मंजूरी साठी प्रस्ताव आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- अशोक काळे यांनी स्टेडीयमचे बांधकामाचे काम केलेले आहे.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- स्टेडियमचे आणि नाटय गृहाचे बांधकाम यामध्ये फरकअसतो.

मा.श्री. जोशी अ.सु.:- नाटय गृहाचे काम लवकरात लवकर व्हावे यासाठी त्वरीत कार्यवाही करावी प्रस्ताव मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मंजूर

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे सावेडी येथे अंदाजे एक हजार आसन व्यवस्था असलेले अद्यावत सभागृह / नाटयगृह बांधणे साठी तांत्रिक सल्लागार नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदाधारक मे. किर्लोस्कर कंन्सलटंन्ट पुणे यांचे, निविदेतील कंन्सल्टीग साठी सर्व्हिस टॅक्स वगळून प्रोजेक्ट किंमतीच्या तीन टक्के प्रमाणेचे दरास अंतीम मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-५ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -५ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे, सुशोभिकरण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये २०,१६,६१९/- खर्चास प्रशासकीय मंजूरी बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अ.नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र.१२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे.

अ.नगर म.न.पा.हद्दीतील प्र.क्र.१२ प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक दरम्यान १५ मि. रूंदीचा मुख्य रस्ता असुन सदर रस्त्याचे सध्या रूंदीकरणाचे व मजबुतीकरणाचे काम सुरू आहे. सदरचा रस्ता शहरातील मुख्य रस्त्यापैकी व नगर मनमाड रस्त्यास जोडणारा असुन सदरचा परिसर अत्यंत वेगाने विकसीत होत आहे. रस्त्यावर प्रसिध्द तिर्थक्षेत्र दत्त मंदिर आहे त्यादृष्टीने नागरिकांच्या सोईसाठी व सौंदर्यीकरणाचा विचार करता सदर रस्त्याचे कडेने फुटपाथ बांधणे, कडेने झाडी लावणे गरजेचे आहे. त्यानुसार सदर ठिकाणी समक्ष पाहणी करून सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक सन २००७-२००८ चे दरसूची नुसार करण्यात आले असुन सदर कामास एकूण रू. २०,१६,६१९/-इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च नविन रस्ते या लेखाशिर्षका अंतर्गत महानगरपालिका फंडातून करावे लागणार आहे. सदरच्या कामांस मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक ५/९/०७ अन्वये प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

तरी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मार्फत प्रशासकीय मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु.:- प्रस्ताव मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- प्रशासकीय मंजूरी द्यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- हे डांबरीकरणाच्या रस्त्याचे ॲडशिनल वर्क आहे.?

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- हयाच कामाबरोबर सहा रस्त्याचे प्रस्ताव मध्ये तसेच इतरही रस्त्यांचे कामांत हया प्रकारचे फुटपाथ, सुशोभिकरणाची कामे करण्यांत येतील.

मा.श्री.जोशी अ.सु.:- वेळ प्रसंगी अनुदाने मिळवून कर्ज उभारून आवश्यक कामे करावीत.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं:- शौचालये ड्रेनेज इत्यादी आवश्यक कामाची सोय करावी पत्र देउन ही कामे अजून झालेली नाहीत.

मा.श्री. जोशी अ.सु.:- इतिवृत्त कायम होण्याची वाटत न पहाता त्वरीत कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- अशा सर्व कामांची टेंडर निघणार आहेत. ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा सभेचे इतिवृत्त कायम घेण्याची वाटत न पहाता याकामां बाबत आवश्यक ती पुढील कारवाई तातडीने करण्यांत यावी.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे, सुशोभिकरण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये २०,१६,६१९/- खर्चास प्रशासकीय मंजूरी बाबत ऑफीस रिपोर्ट.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१२ मधील प्रोफेसर कॉलनी चौक ते प्रेमदान चौक दरम्यान रस्त्याचे दोन्ही बाजूस फुटपाथ करणे सुशोभिकरण करणेचे कामास व एस्टीमेट रूपये २०,१६,६१९/- (रूपये वीस लाख सोळा हजार सहाशे एकोणीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही तातडीने करावी.
सुचक :- मा.श्री. जोशी अ.सु.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-६ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -६ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी यांना दरमहा घरभाडे देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- महानगरपालिकेकडील अधिकारी यांना घरभाडे मिळणेबाबत.

मा.शासनाने महानगरपालिका अधिनियमानुसार अहमदनगर महानगरपालिकेत मा.आयुक्त, मा.उपायुक्त, मा.शहर अभियंता, मा. मुख्य लेखाधिकारी इ. मंजूर केलेल्या वैधानिक पदावरील अधिका-यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेचे त्रिदल निवासस्थान असुन सदर ठिकाणी वैदयकीय अधिकारी व इतर अधिकारी रहात असल्याने वर नमुद केलेल्या अधिका-यांना निवासस्थान उपलब्ध नाही. तथापी उपरोक्त अधिका-यांना निवासस्थानाची व्यवस्था करणेची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने शहरात निवासस्थान भाडयाने घेवून त्याचे दरमहाचे भाडे महानगरपालिकेतर्फे देणेबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे सहा.आयुक्त यांचा अहवाल असे.
सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.
हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु.:-प्रस्ताव मंजूर करावा. शासनाचे नियमानुसार आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं.:- रितसर आहे. मंजूर करावा.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- सभेपुढे म.न.पा.चे अधिकारी यांना सध्या असलेली निवासस्थाने अपुरी पडत असल्याने मा.उपायुक्त , कॅफो व शहर अभियंता हे निवास स्थाने भाडयाने घेउन रहात आहेत. व मा.आयुक्त साहेब वगळता सदरचा खर्च त्यांना स्वतः करावा लागत आहे.तथापी सदर अधिका-यांना निवासस्थाने देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्यामुळे तसेच शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या घरभाडयाचा अंदाज विचारात घेता. मा.आयुक्त साहेब यांना रूपये ७००० ते १०,०००/- व उपायुक्त, कॅफो व शहर अभियंता यांना रूपये ५,०००/- ते रूपये ७,०००/- चे दरम्यान दरमहा घरभाडे महानगरपालिके तर्फे देणे योग्य घेईल. सबब आदेशार्थ सादर याप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला असून मा.आयुक्त साहेबांकरिता रूपये ७,०००/- ते रूपये १०,०००/- आणि उपायुक्त व इतर अधिका-यासाठी रूपये ५,०००/- ते रूपये ७,०००/- पर्यत घरभाडे भत्ता देणे विषयी निश्चित रक्कम ठरवावी अगर अधिका-याकरिता निवासस्थानांची व्यवस्था म.न.पाने करावी.

शहर अभियंता श्री.पालवे व्ही.डी.:- सिटी, एरिया प्रमाणे नियमानुसार पगारांचे टक्केवारी प्रमाणे घरभाडे भत्ता मंजूर करण्यांत यावा.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- शहराची लोकसंख्या त्या साठी पाच लाख असावी लागते.आपले शहराची लोकसंख्या कमी आहे.

मा.श्री. घुले अ.ह.:- मा.आयुक्त साहेबांकरिता रूपये ९,०००/- घरभाडे भत्ता देणेस मंजूरी द्यावी.

मा.श्री.तिवारी सु.र.:-मा.उपायुक्त व इतर अधिका-यासाठी रूपये सात हजार घरभाडे भत्ता देणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-ऑफीस रिपोर्टा नुसार मा.आयुक्त साहेबांकरिता रूपये नउ हजार व मा.उपायुक्त व इतर अधिका-यासाठी रूपये ७,०००/- घरभाडे भत्ता देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी यांना घरभाडे भत्ता देणे विषयी कार्यालयाने सादर केलेला ऑफीस रिपोर्ट पहाता मा.आयुक्त साहेब यांना दरमहा घरभाडे भत्ता रूपये ९,०००/- (रूपये नउ हजार फक्त)व मा.उपायुक्त,कॅफो व शहर अभिंयता अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना दरमहा रूपये ७,०००/- (रूपये सात हजार फक्त) घरभाडे भत्ता देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. घुले अ.ह.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-७ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -७ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-**अहमदनगर महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे दोन बाजूचे कंपाम्पौड वॉल नव्याने बांधणे,फर्शी बदलणे,कॉक्रीटीकरण, पाण्याचा हौद,शौचालय,व मुतारी दुरूस्ती इत्यादी कामे करणेस व रक्कम रूपये २०,९७,९९९/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे नुतनीकरण करणे बाबत.

मा.सादर,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे बांधकाम तात्कालीन नगरपरिषद असताना सुमारे १३ वर्षापुर्वी करण्यात आले होते. सद्यस्थितीत स्मारकाचे काही प्रमाणात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. सदर बाबत मा. महापौर श्री. संदीप ए. कोतकर, मा. उपमहापौर श्री. दिपक सुळ , मा. नगरसेवक श्री. अंबादास गारूडकर, मा. नगरसेवक श्री. मनेष साठे, मा.नगरसेवक श्री. अशोक कानडे यांनी स्मारकाचे नुतनीकरण करणे बाबत सुचविले आहे. तसेच डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्मारकाचे दुरूस्ती बाबत भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन अ.नगर या संघटनेने महानगरपालिकेवर स्मारक दुरूस्ती करणेच्या मागणी बाबत दि.१६/७/०७ रोजी सत्याग्रह आंदोलन केले होते. या व्यतिरिक्त श्री. अजय साळवे, जिल्हा सरचिटणीस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांचे नेतृत्वाखाली इंम्पिरियल चौक येथे स्मारक दुरूस्ती बाबत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.

पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्री. सुनिल क्षेत्रे यांनी मा.जिल्हाधिकारी कार्यालया समोर स्मारक दुरूस्ती बाबत आमरण उपोषाण केले होते.सदर स्मारक दुरूस्ती बाबत म.न.पा. सभागृह येथे दि. २७/८/२००७ रोजी मा.उपमहापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस बहुसंख्येने वरील संघटनांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

सदर बैठकीमध्ये स्मारक दुरूस्ती बाबत उहापोह करण्यात आला. तसेच स्मारकाची जागा शासनाकडे हस्तांतरन करून तेथे सामाजिक न्यायभवन बांधणेच्या कामास विरोध करण्यात आला. व सदर ठिकाणी स्मारकाचे नुतनीकरण करणे बाबत सुचित करण्यात आले.

त्यानुसार स्मारक दुरूस्ती बाबत मा.शहर अभियंता यांचे समवेत पाहणी केली असता खालील प्रमाणे बाबी निर्दशनास आल्या.

१] दोन बाजुंचे कम्पौंडवॉल नव्याने बांधणे गरजेचे आहे.

२] फरशा बदलणे गरजेचे आहे. कॉक्रीटीकरण, पाण्याचा हौद, शौचालय व मुतारी दुरूस्ती करावी लागेल. काही ठिकाणी बांधकाम करणे, स्मारकाचे दरवाजे व खिडक्या दुरूस्त करणे आवश्यक आहे. स्मारकाचे आतील व बाहेरील बाजुने रंग देणे आवश्यक आहे. पिण्याच्या पाण्याकरिता सिंटेक्स वॉटर टैंक बसविणे गरजेचे आहे.

उपरोक्त कामे करणे बाबत सन२००७-२००८ चे सार्व.बांधकाम विभागाचे दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०,९७,९९९/-इतकी आहे. सदरचे काम मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत प्रस्तावीत करण्यात येत आहे. सन २००७-२००८चे अंदाजपत्रकामध्ये सद्यस्थितीत मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत रक्कम रू. १६,३६,०५२/- इतकी शिल्लक आहे. उर्वरीत जादा रक्कम रू. ४,६१,९४७/- च्या खर्चाची तरतूद सन २००७-२००८ च्या पुर्ननियोजन अंदाजपत्रकामध्ये करता येईल.

तरी वरील कामास व खर्चास प्रशासकीय मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभें मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.श्री. जोशी अ.सु.:- हा विषय सेन्सेसटीव्ह आहे. या कामाचे एस्टीमेट करतांना वास्तुचे चांगल्या क्वालीटीचे काम होईल याकडे लक्ष द्यावे एस्टीमेट खर्च वाढला तरी चालेल मात्र इमारतीचे काम चांगले व्हावे.तेथे पाण्याची व्यवस्था करावी लागल्यास बोअर घ्यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- पूर्वी श्री. अहिरे साहेबांनी पाच ते सात लाखाचे सदर इमारतीचे दुरूस्तीचे काम केलेले होते. स्टेज लगतच्या मोठया खोल्या बारीक केल्या ड्रेनेज लाईन वर आणि संडासे खाली असे काम होउ नये. पिण्याचे पाण्यासाठी हौदाची, लाईटींग ची चांगली व्यवस्था, तेथील मोकळया जागी कायम स्वरूपी शेड करावी मंडपाची सोय होईल.तसेच रोडवर सिमेंट पेव्हींग ब्लॉक टाकणे चे काम करावे सदरची कामे कायम स्वरूपी होईल हे पहावे.

मा.श्री. जोशी अ.सु.:- आवश्यक कामांसाठीचे येणारे वाढीव खर्चास कामास सर्वानुमते मंजूरी गृहीत धरून मंजूरी द्यावी.

मा.सौ. शेंडगे रो.सं.:- मंजूरी द्यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा. आवश्यक ते प्रमाणे कामे करण्यांत येउन इमारतीचे काम चांगल्या क्वालीटीचे कायम स्वरूपी होईल असे करण्यांत यावे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे दोन बाजूचे कंम्पौन्ड वॉल नव्याने बांधणे,फर्शी बदलणे, कॉक्रीटीकरण, पाण्याचा हौद, शौचालय, व मुतारी दुरूस्ती इत्यादी कामे करणेस व रक्कम रूपये २०,९७,९९९/- (रूपये वीस लाख सत्याण्णव हजार नउशे नव्याण्णव फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.शेंडगे रो.सं. सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पो.ज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-८ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -८ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी, पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजासाठी आर.टी.ओ.कडील योग्य परवाना धारक वाहने सन २००७-२००८ सालाकरिता भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अहमदनगर महानगरपालिकचे मा.अधिकारी व मा.पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी आर.टी.ओ. नियमाप्रमाणे योग्य परवाना धारक वाहने सन २००७-२००८ सालाकरिता भाडयाने लावणेबाबत.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या मा. अधिकारी व मा.पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजा करिता आर.टी.ओ. नियमाप्रमाणे योग्य परवानाधारक वाहने भाडयाने लावणेकरिता दैनिक सामना दि.२०/४/०७ च्या वृत्तपत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द केली होती. त्या नोटीशीची कालावधी २०/४/०७ ते ८/५/०७ पर्यत होता. त्या नोटीसीनुसार एकूण ४ दरपत्रके खालीलप्रमाणे वेळेत व मुदतीत प्राप्त झालेले आहेत.

१] वरद विनायक ट्रॅव्हल्स ३] मारूती ट्रॅव्हल्स

२] कपिलेश्वर ट्रॅव्हल्स ४] शंभू ट्रॅव्हल्स

वरील चार दरपत्रक धारकांनी वाहन भाडयाचे मागील वर्षापेक्षा ........% जादा भरलेले आहेत. वाटाघाटीकरिता बील दिले असता. वरद विनायक व मारूती ट्रॅव्हल्स यांनी दरपत्रकातील दर योग्य असलेबाबत पत्र दिले आहे. शंभू ट्रॅव्हल्स, कपिलेश्वर ट्रॅव्हल्स यांचे जादा दराचे पत्र आले असुन, कमीत कमी दराचे पूर्वीचे त्यांचे दरपत्रक निविदा छाननी समितीने शिफारस केलेले मा.स्थायी समितीपुढे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ [क] नुसार मंजुरीसाठी सादर करणेत येत आहे.

दि. १४/९/२००७ चे निविदा समिती समोर अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.अधिकारी/ पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजाकरिता भाडयाने वाहन पुरवविणे बाबत आलेले दरपत्रके, रिपोर्टसह सादर केले असता मा.सभापती, मा.उपसभापती, मुख्य लेखापरिक्षक, लेखापाल व सचिव यांच्या उपस्थितीत खालील प्रमाणे मंजूरी देण्यात आली आहे.

| कपिलेश्वर ट्रॅव्हल्स | | | शंभु ट्रॅव्हल्स | | |
|---|---|---|---|---|---|
| मॉडेल | प्रतिदिनी इंधना व्यतिरिक्त | अॅव्हरेज | मॉडेल | प्रतिदिनी इंधना व्यतिरिक्त | अॅव्हरेज |
| टाटा सुमो<br>इंडिका<br>मार्शल | ५२५/-<br>४९०/-<br>५२५/- | १० कि.मी.<br>१७ कि.मी.<br>१० कि.मी. | कॉलीस<br>स्कॉर्पियो<br>मारूती व्हॅन | ७००/-<br>७००/-<br>४५०/- | ११ कि.मी.<br>१० कि.मी.<br>१० कि.मी. |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वाहनांचे अॅव्हरेज नुसार प्रति .कि.मी. इंधनाव्यतिरिक्त दर कपिलेश्वर ट्रॅव्हल्स व शंभु ट्रॅव्हल्स यांचे निविदा समिती शिफारस करीत आहे. व पुढील मंजूरीसाठी मा.स्थायी समितीकडे पाठवित आहे.

येणे प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी, पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजासाठी आर.टी.ओ.कडील योग्य परवाना धारक वाहने सन २००७-२००८ सालाकरिता भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट निर्णयार्थ.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.उपायुक्त श्री.हांगे साहेब :- आलेले कमीचे दरास मान्यता देणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- शहराचे चार झोन करिता पाणी पुरवठा व महिला बाल कल्याण समितीचे उपसभापती यांचे साठी ही वाहनांची सोय करावी. वाहने असणारा करिता नियमाप्रमाणे वाहन भत्ता देणेत यावा.

मा.श्री. घुले अ.ह. :- मंजूर करण्यांत यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मंजूर करावे वाहने असणारांना वाहन भत्ता देणेत यावी.

मा.सभापती साहेब :- आलेले कमीचे दरास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच महानगरपालिकेचे महिला व बाल कल्याण समिती उपसभापती यांचे करिता तसेच पाणी पुरवठा विभाग व शहराचे चार झोन करिता वाहनांची सोय पुरविण्यांस मंजूरी देण्यात येत आहे.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे मा.अधिकारी, पदाधिकारी यांचे कार्यालयीन प्रशासकीय कामकाजासाठी आर.टी.ओ. कडील योग्य परवाना धारक वाहने सन २००७-२००८ सालाकरिता भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलणात्मक तक्ता व त्या वरील ऑफीस रिपोर्ट पहाता कपिलेश्वर ट्रॅव्हल्स व शंभू ट्रॅव्हल्स यांचे प्रति कि मी इंधना व्यतिरिक्त चे छाननी समितीने शिफारस केलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे महिला व बाल कल्याण समिती उपसभापती यांचे करिता तसेच पाणी पुरवठा विभाग आणि शहराचे चार झोन करिता वाहनांची सोय पुरविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-९ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -९ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे विविध विकास कामाकरिता खाजगी कंन्सलंटट नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक श्रीखंडे कंन्सलटंट प्रा.ली. नवी मुंबई यांचे कमीचे दरास अंतीम मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय-अहमदनगर महानगरपालिकाच्या विविध विकास कामाकरिता खाजगी कंन्सलटंट नेमणे बाबत.

अहमदनगर महानगरपालिकाच्या विविध विकास कामाकरिता खाजगी कन्सलंटंट नेमणे बाबत दैनिक केसरी मधे दि. ७/९/२००७ रोजी निविदा मागविण्यांत आल्या होत्या. उपरोक्त कामाच्या ५ सिलबंद निविदा मुदतीत प्राप्त झाल्या. सदर संस्थाची नावे खालील प्रमाणे.

१] अविष्कार ग्रुप, अ.नगर
२] श्री. नंदकुमार जे भांडारकर, जळगांव
३] मे. अशोक काळे & असो. अ.नगर
४] ग्रीड कन्सलटंट,अ.नगर
५] श्रीखंडे कन्सलटंट प्रा.लि. नवी मुंबई

सदर दरपत्रके दि. २८/९/२००७ रोजी मा.उपायुक्त (सा) यांचे समोर उघडण्यात आली. सदर बाबत संबधीत संस्थाची दरपत्रके दि. ९/१०/२००७ रोजीच्या छाननी समितीपुढे ठेवली असता 'अ' अप्रकारच्या कामासाठी श्रीखंडे कंन्सलटंट प्रा.लि. नवी मुंबई यांची शिफारस कळविण्यात आली.

मा.आयुक्त साहेब यांचे दि. १७/१०/०७ रोजीच्या मान्यतेनुसार सदर प्रस्ताव अंतीम मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस सविनय सादर.

येणे प्रमाणे शहर अभियंता यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. घुले अ.ह.:- कोण कोणत्या निविदा आलेल्या आहेत ते सांगावे.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी.:- पांच निविदा आल्या होत्या.

मा.श्री.घुले अ.ह.:- काय दराची, लोएस्ट निविदा कोणाची आली माहिती सांगावी.

शहर अभियंता श्री. पालवे व्ही.डी. :- सदर प्रकरणी १] अविष्कार ग्रुप, अ.नगर २] श्री. नंदकुमार जे भांडारकर, जळगांव ३] मे. अशोक काळे & असो. अ.नगर ४] ग्रीड कन्सलटंट,अ.नगर ५] श्रीखंडे कन्सलटंट प्रा.लि. नवी मुंबई यांच्या निविदा झाल्या असुन कमीचे निविदा धारक यांना मोठया प्रमाणात असलेल्या कामाचा अनुभव लक्षात घेता त्यांचे निविदा दरास मंजूरी दिलेली असून आपले चाळीस कोटी रूपयाची कामे केल्याचे अटी पेक्षा सदर कमी दराचे निविदा धारकांनी ७७४ कोटी रूपयांची कामे केलेली आहेत.सल्लागार म्हणून रूपये ७१३ कोटीची कामे त्यांनी केलेली आहेत.

मा.श्री. मुदस्सर अ.इ.:- कामाचा लोड त्यांचे कडे वाढलेस ते आपली कामे लवकर करणार का?

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- त्या संस्थेकडे ३५० चे वर इंजिनिअर असून आपले शहराचा चेहरा मोहरा बदलणे साठी अशा प्रस्तावाना प्राधान्याने मंजूरी देउन तातडीने कार्यवाही करावी.

मा.श्री.जोशी अ.सु.:- आपले कडेस इंजिनिअर कमी असलेने अशा कंन्सलटंट एजन्सी नेमणे विषयी सुचना केली होती.

मा.उपायुक्त श्री. हांगे साहेब :- प्रतेंक झोनसाठी झोन मधील पाणी,लाईट, सुशोभिकरण प्ले ग्राउन्ड करणे इत्यादी कामे सुचवून करून घेणे साठी अशा एजन्सी नेमणे बाबत सुचविले होते.

मा.श्री. तिवारी सु.र.:- कमीचे दर मंजूर करावे.

मा.श्री. घुले अ.ह. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- आलेल्या प्रस्तावास सर्वानुमते अंतीम मंजूरी देण्यांत यावी. इतिवृत्त कायम होण्यांची वाट पाहू नये आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेचे विविध विकास कामाकरिता खाजगी कंन्सलंटट नेमणे कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दर धारक श्रीखंडे कंन्सलंटट प्रा.ली. नवी मुंबई यांचे कमीचे दरास अंतीम मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र.

अनुमोदक :- मा.श्री.घुले अ.ह.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-१० शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -१० शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यी मध्ये विविध तेरा ठिकाणी जलवाहिनी टाकणे करिता आवश्यक १०० ते ३५० एम.एम.व्यासाचे डी.आय.के..९ पाईप जिन्दाल सॉ.लि. यांचे कडून थेट खरेदी करणेस व त्या कामी येणारे रक्कम रूपये ७२,२७,००८/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये विविध ठिकाणी जलवाहिन्या टाकण्या करीता डि.आय.पाईप खरेदी करणे बाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे बाबत अहमदनगर महानगरपालिका मार्फत डी.आय.पाईप खरेदी करणे करीता जाहिर निविदा मागविण्यांत आल्या होत्या.

उपरोक्त प्राप्त निविदेतील दर व डी.एस .आर.मधील दर व म.जि.प्रा.कडील दर करार असलेले दर व जिंदाल सॉ.लि. यांचे दरा बाबत तक्ता खालील प्रमाणे

| अ नं | पाईपचा प्रकार | टेंडर मधील सर्वात कमी निविदाधारकाचे दर प्रती मीटर | म.जि.प्रा.चा डी.एस.आर. ०६-०७ नुसार दर प्रतिमीटर | म.जि.प्रा.कडील दर करारा नुसारचे दर प्रति मीटर | जिंदाल सॉ.लि.यांचे दि.१७/१०/०७ रोजी प्राप्त झालेले दर प्रति मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १००mmडी.आय.के.९ | रू. ९७५/- | ५८०/- | ६१९/- | ७०३.५०/- |
| २ | १५०mmडी.आय.के.९ | रू. १४९०/- | ८४२/- | ८७२/- | १०२९/- |
| ३ | २००mmडी.आय.के.९ | रू. २०५०/- | ११५०/- | ११६१/- | १३०७.२५/- |
| ४ | २५०mmडी.आय.के.९ | रू. २७००/- | १५२०/- | १५४१/- | १७५३.५०/- |
| ५ | ३००mmडी.आय.के.९ | रू. ३४००/- | १८२१/- | १९१३/- | २२२६.००/- |
| ६ | ३५०mmडी.आय.के.९ | रू. ३८००/- | २२८३/- | २४३४/- | २७५१/- |
| ७ | ४००mmडी.आय.के.९ | रू. ५१०१/- | २७६०/- | २८९९/- | ३२८६.५०/- |

वरील प्राप्त निविदा व म.जि.प्रा.शी. दर करार असलेल्या दराशी तुलना करता निविदेमधील सर्वात कमी दर असलेल्या निविदा धारकाने नमुद केलेले दर हे ७० ते ८० % जादा प्राप्त झालेले असुन ते अवाजवी आहेत. प्राप्त निविदेमधील सर्वात कमी दर असणारे निविदाधारक मे. विंद्य ट्रेडर्स, यांना वाटाघाटीसाठी जा.नं. स्टोअर- २३३६ दि. ११/१०/०७ अन्वये पत्र दिले असता, त्यांनी कुठल्याही प्रकारे प्रतिसाद दिलेला नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील दरकरार असलेल्या जिंदला सॉ.लि. यांचेकडून म.न.पा. च्या केडगांव, मुंकुदनगर, विनायकनगर,सावेडी भिस्तबाग भागासाठी जलवाहिनी टाकणे करीता दरकराराने पाईप खरेदी केलेले आहेत. जिंदाल सॉ.लि. ही कंपनी डी.आय.पाईपची उत्पादक असून निविदा भरलेल्या संस्था हया उत्पादक नसून सप्लायर आहेत.

दि. १०/१०/०७ रोजी झालेल्या सर्व साधारण सभेमध्ये डि.आय.पाईप खरेदी करणे बाबत चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये म.जि.प्रा.चा. जिंदाल सॉ.लि. या कंपनीबरोबर झालेल्या दर करारानुसार पाईप खरेदी करणे शक्य नसल्यास त्यांचे दर पत्रक मागवून व ते इतर दरांशी तुलना करून सदर दर कमी असल्यास त्यांचेकडून थेट खरेदी करणेचे सुचित करण्यात आले.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कडील दरकरार असलेल्या जिंदाल सॉ.लि. यांचे कडेस दर करारानुसार पाईप पुरवठा करणे बाबत विचारणा केली असता त्यांनी दि.१६/१०/२००७ रोजी पाईप साठी आवश्यक असणारा कच्चा माल (रॉ.मटेरियल) च्या किंमतीमध्ये वाढ झालेली असल्यामुळे म.जि.प्रा. बरोबर झालेल्या दरकरारानुसार पाईप पुरवठा करणे शक्य नसल्याचे कळविले आहे.

दि. १६/१०/२००७ रोजी मा.आयुक्त यांचे कार्यालया मध्ये पाईप खरेदी बाबत चर्चा झाली. सदर चर्चेस मा.नगरसेवक श्री. भानुदास ए.कोतकर, मा.स्थायी समिती सदस्य श्री. सुनिल त्रिपाठी व शहर अभियंता उपस्थित होते. सदर चर्चेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या हद्द वाढीतील भागाकरिता व शहरातील आवश्यक ठिकाणी जलवाहिनी टाकणे करीता पाईप खरेदी बाबत चर्चा झाली. जलवाहिनीचे कामाबाबत म.जि.प्रा.चे सन ०६/०७ चे दरसुचीतील दर व प्रत्यक्ष बाजारातील पाईपचे दर यामध्ये तफावत असल्याने जलवाहिनीचे कामाची निविदा मागविल्यास त्यास ठेकेदारकडून प्रतिसाद मिळत नाही. अथवा निविदा रकमेपेक्षा २५ ते ३० % जादा दराने निविद प्राप्त होतात. परिणामी पाणी पुरवठयाची कामे प्रलंबित राहतात.

जिंदाल सॉ.लि. यांनी आज दि. १७/१०/०७ रोजी फॅक्सद्वारे कळविलेले दर हे म.जि.प्रा. कडील दरकरार असलेल्या दरापेक्षा १५ ते १७ % जादा येत आहेत. पंरतु निविदेतील प्राप्त दरांशी तुलना करता ५० ते ६०% ने कमी आहेत. त्यामुळे थेट कंपनीकडून पाईप खरेदी केल्यास महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल.

त्यानुसार अहमदनगर म.न.पा. हद्दीतील विविध ठिकाणी जलवाहिनी टाकणे करीता खालीलप्रमाणे पाईप खरेदी करणेची आवश्यकता आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | आवश्यक असणारे पाईप व त्याची लांबी डी.आय.के.९ | जिंदाल सॉ.लि.यांचे प्राप्त दर (प्रती मीटर) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | आगरकर मळा,पा.पु.योजनोकरीता जलवाहिनी टाकणे | ३५० एम.एम. ४६० र.मी. | २७५१/- | १२,६५,४६०/- |
| २. | केडगांव,मोहिनीनगर करीता अतिरिक्त जलवाहिनी टाकणे | २०० एम.एम. ५८० र.मी. | १३०७.२५/- | ७,५८,२०५/- |
| ३. | सारसनगर भागात केदारेवस्ती ते मधूबन कॉलनीपर्यत जलवाहिनी टाकणे | १०० एम.एम. ९५० र.मी. | ७०३.५० | ६,६८,३२५/- |
| ४. | कोठीरोड लगत जलवाहिनी टाकणे. | २५० एम.एम. ६५० र.मी. | १७५३.५०/- | ११,३९,७७५/- |
| ५. | मार्केट यार्ड चौक ते सारसनगर पुलापर्यत जलवाहिनी टाकणे. | १५० एम.एम. ३८० र.मी. | १०२९/- | ३,९१,०२०/- |
| ६. | मार्केटयार्ड चौक ते ढोरवस्ती पर्यत जलवाहिनी टाकणे. | १५० एम.एम. ६१५ र.मी. | १०२९/- | ६,३२,८३५/- |
| ७. | सर्जेपुरा चौक ते तोफखाना दवाखान्यापर्यत जलवाहिनी टाकणे | १५० एम.एम. ४५० र.मी. | १०२९/- | ४,६३,०५०/- |
| ८. | तोफखानाचौक ते पोटे घर ते मोची वाडयापर्यत जलवाहिनी टाकणे. | १०० एम.एम. ८० र.मी. | ७०३.५०/- | ५६,२८०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | शहाजी रोड लगत जलवाहिनी टाकणे | १५० एम.एम. २५० र.मी. | १०२९/- | २,५७,२५०/- |
| १०. | मुकुंदनगर, इरीगेशन कार्यालय ते दत्त मंदिरापर्यत जलवाहिनी टाकणे | २०० एम.एम. २३५ र.मी. | १३०७.२५/- | ३,०७,२०३/- |
| ११. | मुकुंदनगर, मरियम मस्जिद जवळ अंतर्गत गल्ल्यांमध्ये जलवाहिनी टाकणे | १०० एम.एम. २८० र.मी. | ७०३.५०/- | १,९६,९८०/- |
| १२. | केडगांव येथे अंबिकानगर बालाजी संपवेल ते शाहूनगरपर्यत जलवाहिनी टाकणे | १५० एम.एम. ९३० र.मी. | १०२९/- | ९,५६,९७०/- |
| १३. | सर्वोदय हॉस्पीटल ते मेहेर कॉलनी जलवाहिनी टाकणे | १०० एम.एम. १९० र.मी. | ७०३.५०/- | १,३३,६६५/- |
| | | | | ७२,२७,००८/- |

वरील प्रमाणे एकुण १३ आवश्यक ठिकाणी १०० एम.एम. ते ३५० एम.एम. व्यासाचे डि.आय.के.९ क्लास पाईप जिंदाल सॉ.लि. मुंबई, यांचेकडून थेट खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रू. ७२,२७,००८/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे पाठविणेस मंजूरी मिळणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

लेखाशिर्ष :- पाण्याची टाकी बांधणे व वाढीव हद्दीत पा.ला.टाकणे

तरतूद :- रू. १०५.०० लाख व ८० लाख

पूर्वीचा खर्च :- २६,४५,१७७ /-व रू. ५८,४१,१९६/-

प्रस्तावीत खर्च :- ७२,२७,००८/-

शिल्लक :- रू. २५,१६,८४८/- व रू. २,६९,६०८/-

येणे प्रमाणे शाखा अभियंता. आर.जी.मेहेत्रे. श्री. एम.डी.काकडे, श्री. व्ही.जी. सोनटक्के, श्री. आर.जी. सातपुते यांचा अहवाल असे.

मा. कार्यकारी अभियंता :- दि. १७/१०/०७ रोजी रजेवर

शहरअभियंता :- पाणी पुरवठा योग्य प्रकारे होणे साठी पाईप लाईनची कामे तातडीने होणेसाठी स्टोअर मार्फत पाईप पुरवठा होणे गरजेचे आहे. यास्तव मंजूरीस्तव सादर.

अं.ले.परिक्षक :- सादर रक्कम रू. ७२,२७,००८/- चे पाईप खरेदी बाबत स्थायी समिती यांचे कडे पु.त. दि. १८/१०/०७

मु.ले.परिक्षकः- जिंदाल सॉ.लि. ही डी.आय.के.९ या पाईपची उत्पादक कंपनी असल्याने सदर कंपनीकडून आवश्यक असलेले पाईप थेट खरेदी करणे योग्य राहील. सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर निर्णयास्तव ठेवणेस हरकत नाही. दि. १८/१०/०७

मा.उपायुक्त साहेब :- 'अ' प्रस्तावीत नुसार करारनामा करणे कामी मा.स्थायी समिती कडे मान्यते साठी पाठविणे कामी आदेशार्थ सादर. दि. २०/१०/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यी मध्ये विविध तेरा ठिकाणी जलवाहिनी टाकणे करिता आवश्यक १०० ते ३५० एम.एम.व्यासाचे डी.आय.के..९ पाईप जिन्दाल सॉ.लि. यांचे कडून थेट खरेदी करणेस व त्या कामी येणारे रक्कम रूपये ७२,२७,००८/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- पाणी पुरवठया साठी पाईप खरेदीस मंजूरी देणेचा विषय आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- कानडे साहेबांचे यादी प्रमाणे पाईप खरेदीस मंजूरी द्यावी. खर्च मंजूर करावा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- त्याच बरोबर हॉटेल पर्वत बोरा ज्वेलर्स व धार्मिक परिक्षा बोर्ड येथ पर्यत ३०० ते ४०० मीटर भागासाठी तीन इंची पाईप खरेदीस मंजूरी द्यावी.

मा.श्री.मुदस्सर अ.इ.:- पाण्याचे टाकी ते डी.एस. पी चौका पर्यत आठ इंची पाईप खरेदीस मंजूरी द्यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- मा.श्री. कानडे साहेबांचे यादी प्रमाणे कामाचे एस्टीमेट तयार केलेले आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं.:- मुकुंदनगर सारसनगर भागाचा पाणी प्रश्न काही अंशी सुटणे करिता वसंत टेकडी ते डी.एस. पी चौक ते शोभा सदन येथे पर्यत डी.आय.पाईप मागवावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- सदर कंपणीशी ओपण रेट कॉन्ट्रॅक्ट करून दरमंजूरी नुसार कामे करावीत.

मा.सभापती साहेब :-ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर. तसेच श्री. कानडे साहेबांचे यादी प्रमाणे व श्री. त्रिपाठी सु.चं. व श्री. शेख मुदस्सर अ.इ. यांनी सुचविलेल्या भागातील आवश्यक पाणी पुरवठयाचे कामासाठी डी.आय.के.९ पाईप लाईन टाकणेचे काम तातडीने करणेस व खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्यी मध्ये विविध तेरा ठिकाणी जलवाहिनी टाकणे करिता आवश्यक १०० ते ३५० एम.एम.व्याचे डी.आय.के..९ पाईप उत्पादक जिन्दाल सॉ.लि. मुंबई यांचे कडून थेट खरेदी करणेस व त्या कामी येणारे रक्कम रूपये ७२,२७,००८/-( रूपये बहात्तर लाख सत्तावीस हजार आठ फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

तसेच नगरसेवक श्री. कानडे यांचे प्रभागातील काकासाहेब म्हस्के कॉलेज, गांधीनगर रोड ते विशाल हनुमान मंदिर पर्यत १४०० मीटर अंतरासाठी सहा इंची पाईप लाईन टाकणे, भिस्तबाग रोड पवननगर कमान ते वडगांव गुप्ता रोड (नंदनवन नगर, अप्सरा कॉलनी) साठी ८०० मीटर सहा इंची पाईप लाईन टाकणे व मा.स्थायी समिती सदस्य श्री. त्रिपाठी सु.चं. व श्री. मुदस्सर अ.इ यांनी सुचविलेल्या त्यांचे भागातील आवश्यक पाणी पुरवठयाचे कामासाठी डी.आय.के. ९ पाईप लाईन टाकणेचे काम तातडीने करणेस व खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.च.

अनुमोदक :- मा.श्री.बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती
अहमदनग महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१०**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक-११ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

ठराव क्रमांक -११ शुक्रवार दिनांक २६/१०/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेची न.र.यो.क्र.४ अं.भू.क्र. १२८ मधील मंजूर रेखाकंन व सौ. सावित्रीबाई फुले व्यापारी संकुला लगतची १० चौ.मी. मोकळी जागा अर्जदार श्री. योगेश नामदेव सोनवणे यांना भाडे कराराने देणे विषयी ऑफीस रिपोर्ट मंजूरीस्तव.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विषय- श्री. योगेश नामदेव सोनवणे, यांना टी.व्ही.सेंटर येथील म्युनिसिपल कॉलनी शेजारील रिकामी जागा भाडे कराराने व्यवसायासाठी देणे बाबत.

अर्जदार योगेश नामदेव सोनवणे यांनी नगररचना क्रमांक-४ अंतीम भूंखड १२८ मधील मंजूर रेखांकन व शॉपींग कॉम्प्लेक्स मधील १० चौ.मी. मोकळी जागा मिळणेबाबत २४/०९/२००७ रोजी अर्ज केला होता.

अर्जदार यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ मधील तरतूदी पाहता सदर जागा वितरणाचे अधिकार मा.स्थायी समितीला आहे. असा अहवाल मा.नगर रचनाकार यांनी दि.२८/९/२००७ रोजी मा.उपायुक्त सामान्य यांच्याकडे सादर केला असता त्यावर सदर प्रकरणी मार्केट विभागामार्फत अधिमुद्यासह सादर करा असा आदेश मा.उपायुक्त साो. सामान्य यांनी दि.७/१०/२००७ रोजी दिला आहे. सदरबाबत सविस्तर अहवाल मा. उपायुक्त कर यांच्याकडे सादर केला असता अहवालानुसार मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करणे आवश्यक असे दिनांक २०/१०/२००७ रोजी आदेश दिलेला आहे.

सदर प्रस्ताव मा.आयुक्त साहेब यांजकडे सादर केला असता सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहे. तरी सदरचा प्रस्तावा मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक, कर संकलन अधिकारी करिता यांचाअहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- नियमानुसार जागा देता येईल.

नगररचनाकार श्री. धोगडे एस.डी. :- मा.सभापती साहेबांकडेस हा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने प्रशासनाचे वतीने तो मागे घेणेत येत असले बाबत पत्र दिलेले आहे.

मा.सभापती साहेब :- अजेंडया वर विषय घेतल्या नंतर सदरचे पत्र दिलेले आहे. नगररचानाकार साहेब आपण प्रस्ताव कायदयानुसार तयार केलेला आहे का? आपले काय मत आहे.

नगर रचनाकार धोगडे एस.डी.:- सदरचे शॉपींग सॅन्टरला कंपाउन्ड केलेले असून शेजारील म्यु.पल. कॉलनी व शॉपींग सेन्टर कंपाउन्ड या मधील १० चौ.मी. मोकळा जागा मिळावी असा अर्ज आल्याने नियमाप्रमाणे तपासणी करून जागा भाडयाने देणे विषयी प्रस्ताव सादर केला आहे

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- प्रस्ताव नियमानुसार च केलेला असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ चे नियमानुसारच तो मंजूरी साठी सभे पुढे सादर केलेला आहे तेथे शॉपींग सेंटर असल्याने व्यवसाय करणे साठी अर्जदार यांना मोकळी जागा भाडेतत्वाने देता येईल.

मा.सभापती साहेब :- नगर रचनाकार साहेब प्रस्ताव नियमानुसार योग्य आहे किंवा नाही ?

नगर रचनाकार श्री. धोगंडे एस.डी. :- होय कायद्याप्रमाणे तयार केलेला आहे.

मा.सभापती साहेब :- नियमानुसार किती वर्षाचे भाडेकराराने जागा देता येईल.

नगर रचनाकार श्री. धोंगडे एस.डी.:- तीन वर्षा करिता देता येईल.

मा. श्री. त्रिपाठी सु.चं. :- तीन वर्षाचे कालावधी साठी जागा भाडे कराराने देण्यांस मंजूरी द्यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्ताव मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- प्रशासनाने नियमानुसार सादर केलेल्या प्रस्तावा प्रमाणे नगर रचनाकार यांनी ठरविलेल्या अटी शर्ती वर अनामत रक्कम रू. एक लाख व दरमहा भाडे रूपये दोनशे चाळीस फक्त घेउन तीन वर्षा साठी अर्जदार यांना व्यवसायाकरिता १० चौ.मी. मोळकी जागा भाडे कराराने देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच म.न.पा.चे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने संबंधीत विभागाने अर्जदार यांना जागेचा ताबा देणेची कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेची न.र.यो.क्र.४ अं.भू.क्र. १२८ मधील मंजूर रेखाकंन व सौ. सावित्रीबाई फुले व्यापारी संकुला लगतची १० चौ.मी. मोकाळी जागा अर्जदार श्री. योगेश नामदेव सोनवणे यांना भाडे कराराने देणे विषयी ऑफीस रिपोर्ट पहाता पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार तयार केलेल्या प्रस्तावा प्रमाणे अर्जदार श्री. योगेश नामदेव सोनवणे यांना त्यांनी मागणी केलेली नगर रचना योजना क्रमांक ४ अं.भू.क्र.१२८ मधील दहा चौरस मीटर मोकळी जागा व्यवसायाकरिता अनामत रक्कम रू. १,००,०००/- (रूपये एक लाख फक्त) व रू.२४०/- (रूपये दोनशे चाळीस फक्त) दरमहा भाडे आकारणी करून नगर रचनाकार अहमदनगर महानगरपालिका यांनी ठरविलेल्या अटी शर्तीवर तीन वर्ष कालावधी साठी अर्जदार यांना भाडेकराराने देण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

तसेच म.न.पा.चे उत्पन्न वाढविणेचे दृष्टीने संबंधीत विभागाने अर्जदार यांना जागेचा ताबा देणेची कार्यवाही तातडीने करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. त्रिपाठी सु.चं.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/- sd
सभापती ,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

" खरी नक्कल "

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका